महाराष्ट्र शासन

क्रमांक : बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(भाग-१)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१९.

प्रति,

कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर,

**विषय :- कायम विनाअनुदानित शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** :- (१) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.११.०७.२०१६.
(२) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.२७.०७.२०१७.
(३) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.१२.०७.२०१८.
(४) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(२)/मशि-२, दि.१२.०७.२०१९.
(५) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.बी.एड-२०१९/ प्र.क्र.५३-१९/सीईटीसेल/११३६६, दि. ३१.०८.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक ५ येथील पत्रान्वये, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केल्यानुसार, पद्मश्री अजित वाडेकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नागपूर या महाविद्यालयास शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या १ युनिटसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या अधीन राहून राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे :-

(क) सदर महाविद्यालयास एन.सी.टी.ई. ने शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमांस यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयाची नोंदणी करताना करावी.

(ख) एन.सी.टी.ई. च्या मान्यतेच्या आदेशाची व नियमाप्रमाणे सदर अभ्यासक्रमांचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.



Scanned by CamScanner

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.०५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१०(ब) व (क) मधील तरतुदी विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) विभागीय सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना सदर महाविद्यालयाच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई. ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ड) सदर महाविद्यालयाकडून तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आली नसल्यास, सदर महाविद्यालयाचे नाव एन.सी.टी.ई. ला कळविण्यात यावे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब सदर महाविद्यालयाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) एन.सी.टी.ई. च्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव एन.सी.टी.ई. ने महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपली,

( रोहिणी भालेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
(३) प्राचार्य, पद्मश्री अजित वाडेकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, साई प्रभू अपार्टमेंट, रविनगर चौक, रामनगर, नागपूर-४४० ०१०.
(४) निवड नस्ती (मशि-२)

Scanned by CamScanner